# भारतीय लोकशाही पुढील आव्हान: विरोधी पक्षाचा शक्तिपात

**सौ. प्रकृती श्रीकांत कारेगावकर**

संशोधक विद्यार्थी

**सारांश:** भारतीय लोकशाही 75 रीत परिपक्व होत असताना विरोधी पक्षाचा शक्तिपात व्हावा, ही बाब लोकशाहीसाठी गंभीर आहे. भविष्यात असेच चालत राहिले तर हे लोकशाही समोरील फार मोठे आव्हान ठरणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतात राजकीय पक्षांची वाटचाल सुरू आहे. स्वातंत्र्यापूर्वी येथील राजकीय पक्षांचा उद्देश स्वतंत्र प्राप्त करणे किंवा ते कोणत्या मार्गाने प्राप्त करता येईल हा होता. स्वातंत्र्यानंतर या विचारात अमुलाग्र सुधारणा होणे गरजेचे होते. मुख्यत्वे करून काँग्रेस पक्षाने यात पुढाकार घेणे आवश्यक होते.पण तसे झाले नाही. काँग्रेस पक्ष आपल्या गत इतिहासावर व व्यवस्थापन कौशल्या च्या बळावर देशाची सत्ता आपल्या हाती ठेवू शकला. त्याचा परिणाम विरोधी पक्ष काही काळ अस्तित्वातच येऊ शकला नाही. तेव्हापासूनच विरोधी पक्षांचा शक्तिपात सुरु झाला. नेहरूंच्या वलयांकित व्यक्तिमत्वामुळे एक हाती सत्ता येत गेली. त्यामुळे काँग्रेस पक्ष फोफावण्यास मदत झाली. पक्षात एक प्रकारची काँग्रेस संस्कृती निर्माण झाली. ती श्रीमती इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्यापर्यंत कायम राहिले. सक्षम विरोधी पक्ष मात्र उदयास येऊ शकला नाही. ती उणीव कायम राहत गेली. भारतात 1992 पर्यंत विरोधी पक्ष अस्तित्वात असला तरी तो संघटित राहू शकला नाही. त्याचे परिणाम भारतीय लोकशाहीवर झाले.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, विरोधी पक्ष, लोकशाही तुलना,

प्रस्तावना:-

भारतीय लोकशाही 75 रीत परिपक्व होत असताना विरोधी पक्षाचा शक्तिपात व्हावा, ही बाब लोकशाहीसाठी गंभीर आहे. भविष्यात असेच चालत राहिले तर हे लोकशाही समोरील फार मोठे आव्हान ठरणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतात राजकीय पक्षांची वाटचाल सुरू आहे. स्वातंत्र्यापूर्वी येथील राजकीय पक्षांचा उद्देश स्वतंत्र प्राप्त करणे किंवा ते कोणत्या मार्गाने प्राप्त करता येईल हा होता. स्वातंत्र्यानंतर या विचारात अमुलाग्र सुधारणा होणे गरजेचे होते. मुख्यत्वे करून काँग्रेस पक्षाने यात पुढाकार घेणे आवश्यक होते.पण तसे झाले नाही. काँग्रेस पक्ष आपल्या गत इतिहासावर व व्यवस्थापन कौशल्या च्या बळावर देशाची सत्ता आपल्या हाती ठेवू शकला. त्याचा परिणाम विरोधी पक्ष काही काळ अस्तित्वातच येऊ शकला नाही. तेव्हापासूनच विरोधी पक्षांचा शक्तिपात सुरु झाला. नेहरूंच्या वलयांकित व्यक्तिमत्वामुळे एक हाती सत्ता येत गेली. त्यामुळे काँग्रेस पक्ष फोफावण्यास मदत झाली. पक्षात एक प्रकारची काँग्रेस संस्कृती निर्माण झाली. ती श्रीमती इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्यापर्यंत कायम राहिले. सक्षम विरोधी पक्ष मात्र उदयास येऊ शकला नाही. ती उणीव कायम राहत गेली. भारतात 1992 पर्यंत विरोधी पक्ष अस्तित्वात असला तरी तो संघटित राहू शकला नाही. त्याचे परिणाम भारतीय लोकशाहीवर झाले. वेगवेगळया विचारांमध्ये तो विखुरला गेला. त्यामुळे भारतीय लोकशाही वयाच्या पन्नाशी पर्यंत विरोधी पक्षाविनाच अडखळत असतानाचे चित्र दिसून येते. पुढे मनमोहन सिंग यांचा कालखंड संक्रमणाचा ठरला आहे. याच काळात विरोधी भूमिकाची पार्श्वभूमी तयार झाली आणि भावनिक आणि सांस्कृतिक आधारावर जनमत एकवटण्यास काँग्रेस पक्षाच्या धोरणाच्या परिणामाच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या प्रश्नांची उपेक्षा केली. अशी लोकांची भावना झाली. काँग्रेसने वाढत्या लोकशाहीला व विकेंद्रीकरणाला साजेसी दृष्टिकोनात्मक बदल करण्याऐवजी फक्त निवडणुकांसाठी सौदेबाजीचे राजकारण करण्यातच या पक्षाचे नेते व्यस्त राहिल्यामुळे आपली ऐतिहासिक भूमिका बजावू शकला नाही. त्यामुळे काँग्रेस पक्षाला प्रादेशिक स्तरावर विरोध करणारे पक्ष उद्यास आले पण त्यांचा शक्तिपात करण्यास विचारधारेच्या आधारावर काँग्रेस पक्ष यशस्वी झाली. येथेच भारतीय लोकशाहीची पीछेहाट झाली. त्यामुळे लोकशाही समोरील आजही हेच खरे आव्हान आहे असे म्हणता येईल.

1992 नंतर भारतातील लोकशाही नवीन वाटचाल सुरू झाली. सांस्कृतिक आणि भावनिक राजकीय प्रश्नांनी राजकारणात खरा प्रवेश केला. विरोधकांचे विचार लोकांना पटू लागले. लोकशाहीमध्ये आपल्यावर अन्याय होतो आहे अशी भावना लोकात निर्माण होऊ लागली. त्याचा परिणाम वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या विचारांची सरकारी अस्तित्वात येऊ लागली. काँग्रेस पक्ष लोकांना गृहीत धरू लागला. भ्रमात राहिला. काही काळ तर लोकांना गृहीतच धरू लागला. तोपर्यंत वेळ निघून गेली होती. श्री मनमोहन सिंग यांच्या दोन टर्मची कारकीर्द संपत असतानाच ज्येष्ठ समाजसेवक श्री अण्णा हजारे यांचे आंदोलन समाज माध्यमाच्या माध्यमातून लोकांपर्यंत

पोहोचले होते. तिकडे गुजरात सारख्या राज्यात भारतीय लोकशाहीचे नवीन मॉडेल तयार होत होते. 2014 च्या सार्वत्रिक निवडणुकात श्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या वलयांकित व्यक्तिमत्त्वाने विरोधी पक्षाचा शक्तिपात घडवून आणला. तो 2019 च्या निवडणुकातही टिकून राहिला. आजतागात विरोधी पक्षांची या परिस्थितीमधून सुटका झालेली नाही.

उपरोक्त सर्व विवेचनाचा आशय हा आहे की भारतीय लोकशाही समृद्ध होण्यासाठी ज्या विरोधी पक्षाची निकोप वाढ व्हावी लागते ती वाढ होऊ शकली नाही. पाश्चात्त्य लोकशाहीत मात्र याबाबत संतुलन राखल्या गेलेल्यांचे जाणवते. त्यासाठीच प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय लोकशाही पुढील आव्हान : विरोधी पक्षांचा शक्तपात हा विषय घेऊन मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका किती महत्त्वाची असते हे पाहणे गरजेचे आहे. जगात लोकशाहीचा विकास विरोधी पक्षांच्या अस्तित्वामुळे झालेला आहे. ते पाहावे लागेल. त्यामुळे जगात कल्याणकारी राज्य उदयास उदयास येण्यास मदत झाली. त्यासाठी पुढील लोकशाही मधील विरोधी पक्षाची भूमिका लक्षात घेणे गरजेचे आहे.

लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका :-

संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाला अतिशय महत्त्व असते. कारण संसदीय लोकशाहीत आजचा विरोधी पक्ष उद्याचा सत्ताधारी पक्ष असतो असे मानले जाते. त्यामुळेच लोकशाही व्यवस्थेचे वैशिष्ट्ये विरोधी पक्ष मानले जाते. साधारणतः लोकशाहीत विरोधी पक्ष जी कार्य पार पाडत असतात ते पुढीलप्रमाणे आहेत : 1) सत्ताधारी पक्षाबरोबर सतत स्पर्धा करणे. 2) सत्तारूढ पक्षाच्या सतत चुका शोधणे त्यांना जनतेसमोर उजागर करणे. 3) सत्तारूढ पक्षाच्या ध्येय आणि धोरणावर सतत टीका करणे. 4) संसदेमध्ये सतत सरकारी पक्षाला प्रश्न विचारणे त्या माध्यमातून मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणे. 5) प्रसारमाध्यमासमोर सत्ताधारी पक्षाच्या जास्तीत जास्त उनिवा उजागर करणे. अशा काही बाबींच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांच्या विरोधी जनमत तयार होत असते. त्यामुळे नंतरच्या कालखंडात विरोधी विचारांचे सरकार येऊ शकते. त्यातूनच धोरणात्मक बदलही होत असतात. परंतु विरोधी पक्ष संघटित रित्या अस्तित्वात नसेल तर देशात एक पक्षीय हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका असतो. प्रस्तुत शोधनिबंधाच्या सुरुवातीच्या भागात आपण त्याबाबत काँग्रेस पक्षाच्या वलयांकित नेतृत्वाच्या संदर्भात भूमिका पाहिली आणि पुढील कालखंडातील श्री नरेंद्र मोदी यांच्या वलयांकित नेतृत्वाची ही भूमिका पाहिली आहे. यानंतर आपल्याला लोकशाही आणि राजकीय पक्ष यांच्याबद्दल थोडक्यात माहिती पाहून आपल्या शोधनिबंधाच्या मुख्य निष्कर्षाकडे वळावयाचे आहे.

लोकशाही:-

आधुनिक काळात लोकशाही हा शासनाचा प्रकार लोकप्रिय मानला जातो. महात्मा गांधी यांनी तर लोकशाहीला जीवन पद्धती असे संबोधले आहे. ते खरेही आहे. या शासन प्रकारात सत्ताही जनतेच्या हातात असते. लोक मतदानाच्या माध्यमातून व्यक्त करत असतात. शांतता हा लोकशाहीचा स्थायीभाव असतो. संघर्ष आणि हिंसेला थारा नसतो. लोकशाहीचे वेगवेगळे प्रकार असले तरी आधुनिक काळात लोकशाहीच्या प्रातिनिधिक स्वरूपाला महत्त्व असल्याचे दिसून येते. त्यामुळेच अब्राहम लिंकन यांची लोकशाहीची व्याख्या सर्वसामान्यांना सुद्धा अवगत झालेली आहे. ती म्हणजे "लोकांनी लोकांकडून आणि लोकांसाठी चालवलेले शासन" या व्याख्येत प्रत्येक शब्दात 'लोक' या शब्दावर जास्तीचा भर असल्याचे दिसून येते. पाश्चात्य लोकशाहीने जगाला काही चांगल्या गोष्टी शिकवण्याचा प्रयत्न केला आहे त्यात जनतेच्या विकासाचे मुद्दे महत्त्वाचे आहेत. ते म्हणजे :

1. शासन व्यवस्थेत लोकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे.

2. लोकांना त्यांच्या आवडीनिवडीप्रमाणे स्वातंत्र्य उपभोगू देणे.

3. नियमित निवडणुका घेऊन शासनाबद्दल जनतेचा कौल घेणे.

4. लोकांना प्रौढ मता अधिकारांच्या माध्यमातून त्यांच्या व्यक्ती स्वातंत्र्याची जोपासना करणे आणि सर्वातात महत्त्वाचे म्हणजे.

5. विरोधी पक्षाचे अस्तित्व मान्य करणे. या ठिकाणी आपल्याला लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाला किती महत्त्व दिलेले आहे हे दिसून येईल.

याबाबत तर इंग्लंडमध्ये "राणीचा विरोधी पक्ष" असे संबोधनच प्रचलित झाल्याची दिसून येते. थोडक्यात लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष हा जनतेचा प्रतोद असतो लोक विरोधी पक्षाकडे आशेने पाहत असतात परंतु भारतीय लोकशाहीचा इतिहास लक्षात घेता असे दिसून येते कीस्वातंत्र्यानंतर प्रत्येक शासनाच्या कालखंडात काही वलयांकित नेत्यांच्या छबीमुळे शक्तिपात झाल्याचे दिसून येते. जे की आपल्या भारतीय लोकशाही समोरील फार मोठी आव्हान आहे. अशा लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची कुचम्बना होऊन त्यांचा शक्तिपात होणार असेल तर जनतेच्या प्रश्नांची माहिती लोकांसमोर कशी येईल. त्यांचे प्रश्न कसे सुटतील? लोकशाहीत कोणत्याही शासन व्यवस्थेचा उद्देश विकास करणे हा जरी असला तरी त्यात त्यांच्या पक्षाचा विचारसरणीनुसार त्यांचे कार्य चालू असते. त्यामुळे त्याचा परिगाम होण्याचा मोठा धोका सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागतो. हे सर्व टाळण्यासाठी जनतेमध्ये लोकशिक्षण घेणे गरजेचे आहे. सुदृढ लोकशाहीसाठी ते सर्व आवश्यक आहे. त्यामुळे लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचा शक्तिपात होता कामा नये. तसे झाल्यास ते येणाऱ्या कालखंडात भारतीय लोकशाही समोरील आव्हान ठरणार आहे. हा थोडक्यात निष्कर्ष आहे.

**संदर्भसूची :-**

१) भोळे भास्कर लक्ष्मण : भारतातील राजकीय व्यवस्था, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर- १९९०.

२) देव विजय : राजकीय विश्लेषण कोष, दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे-३० - १९९७.

३) जोशी बी. आर. : सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांतांचा कोष, डायमंड पब्लिकेशन पुणे, २००७

४) एम. लक्ष्मीकांत : इंडियन पॉलिटी, के. सागर पब्लिकेशन सदाशिवपेठ पुणे, २०१७.

५) सुहास पळशीकर, : महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष, सुहास कुलकर्णी, राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन पुणे - २०११.

६) शिंदे राजेंद्र (संपादक) : भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह क्रिएटिव्ह पब्लिकेशन - २०२०.

७) पहा : युट्युब चॅनेल : स्पर्धापरीक्षा राज्यशास्त्र - dwarkaprasad wayal